
# एका तरूण विधवेला कुटुंब मिळते

**प्रार्थना:** "प्रिय प्रभु, रूथ नामी आणि बवाज यांच्यासारखे आपल्या नातेवाईकांवर प्रेम करण्यास मुलांना साहाय्य कर."



प्रीती विषयीचा महान थोर कथावृत्तांत्त सांगण्याची तयारी करा. वाचा रूथ अध्याय 1-4.

- ख्रिस्ताने त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांवर कसे प्रेम केले आणि त्यांचे तारण केले हे बवाजच्या रूथवरील प्रेमावरून पहायला मिळते.
- हा कथावृत्तांत्त तुम्हांला आठवडाभर शिकवता येईल किंवा त्याचे काहीच भाग ही शिकवता येतील.

मोठया मुलांनी किंवा शिक्षकांनी कथा वृत्तांत सांगावा. तीन किंवा चार मुलांना एकेका अध्यायातील मुख्य प्रसंग सांगायला सांगा.

**अध्याय 1** स्पष्ट करा:

- एक इस्राएली मनुष्य आपली पत्नी नामी व दोन मुलांसह इस्राएल सोडून मवाब येथे राहण्यास गेला.दोन मुलांनी रूथ आणि अर्पा ह्या मवाबी तरूणींशी विवाह केला.
- तीन विधवा स्त्रियांना मागे ठेवून तीनही पुरूष मरण पावले. अन्नाच्या शोधात नामीला पुन्हा इस्राएलला परत जाणे भाग पडले.
- रूथ आणि अर्पाला नामी सोबत जायचे होते. पण त्यांनी आपआपल्या आई वडीलांकडे परत जावे असे नामीने सांगितले.
- अर्पा नामीच्या गळयात पडून रडली आणि आपल्या माहेरी परत गोली. परंतु आपल्या विधवा सासूला नामीला घट्ट बिलगून राहीली आणि तिच्या बरोबर इस्राएलला जाण्याचा हट्ट धरला अशा प्रकारे तिने आपले प्रेम आणि निष्ठा प्रकट केली.

**अध्याय 2** स्पष्ट करा:

रूथ बवाजच्या शेतात सरवा वेचायला जात असे. मिळणारे धान्य ती व नामी खात असत सरवा वेचणाऱ्या रूथशी आपुलकीने आणि आदराने वागून धनाढय बवाजने आपल्या उमद्या मनाचा परिचय करून दिला. कामकऱ्यांनी कापणी करताना मागे सोडलेला सरवा वेचण्यास प्राचीन इस्राएलच्या कायद्याने गरीब लोकांना परवानगी दिली होती.

- रूथला तिच्या व नामीसाठी खाण्यास धान्य कोठून मिळाले? (उत्तर पाहा रूथ 2:3)
- रूथ शेतात किती कष्ट करीत होती? (पाहा वचन 7)
- रूथ गरीब व परक्या देशातील होती म्हणून बवाजने तिला वाईट वागणूक दिली का? (पाहा वचने 14-15)
- आपल्या गरीब सासूला नामीला मदत करण्यासाठी रूथने काय केले? (पाहा वचन 18)

**अध्याय 3** स्पष्ट करा:

- रूथने तिचे हक्क शाबित ठेवण्यासाठी तिच्याशी लग्न करण्यासाठी एका नातेवाईला बवाजला धाडसाने विचारले.

- प्राचीन परंपरेनुसार दंगल, दारिद्रय याला बळी पडलेल्याचा सूड व सुटका करण्यासाठी किंवा वारसा विना मरण पालेल्याचे हक्क अबाधित राखण्यासाठी जवळच्या पुरूष आप्ताची गरज असे.
- बवाज हा आमची सैतानापासून सुटका करण्याऱ्या आमच्या तारणाऱ्या येशूचे उदाहरण होता.

**अध्याय** 4 स्पष्ट करा:

- रूथशी अधिक जवळचे नाते असणाऱ्या आप्ताशी बवाज अतिशय सूज्ञपणे वागला जेणे करून पुढे याच आप्ताने बवाजला रूथशी लग्न करण्यास परवानगी द्यावी.
- लग्न करून आणि त्यांच्या मुलाचे संगोपन करण्यात नामीची मदत घेऊन बवाज व रूथने प्रेम दाखवले.
- थोर राजा आणि येशूचा पूर्वज अशा दावीदाची रूथ ही पणजी होय.

रूथच्या कथावृत्तांताचे **नाट्यीकरण करा.** उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा. मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करून घ्यावी.

**मोठया मुलांनी** किंवा प्रौढांनी **रूथ, नामी** व **निवेदक** ह्या भूमिका करण्यात निवेदकान कथावृत्तांत्ताचा सारांश तयार करून मुलांकडून संवाद पाठ करून घ्यावेत.

**लहान मुलांनी, अर्पा** आणि **कामकरी** ह्या भूमिका कराव्यात. धान्य म्हणून कामकऱ्यांनी हातात पाने किंवा काठया धराण्यात.

**नाटिका**

**निवेदक:** रूथ अध्याय 1 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग थोडक्यात सांगुन म्हणा "नामी रूथ व अर्पाला काय सांगते ते ऐका."

**नामी:** "आपल्या तिघींचेही नवरे मरण पावले. मी आता उपजीविका चालवण्यासाठी इस्राएलला परत जाते आणि तुम्ही आपआपल्या माहेरी जा."

**अर्पा:** नामीच्या गळयात पडून रडा आणि मग निघून जा

**रूथ:** नामीसमोर गुडघे टेकून बसा आणि आर्जव करा.

"तुम्ही जेथे जाल तेथे मी येईन तुम्ही जेथे राहाल तेथे मी राहीन तुमचे लोक ते माझे लोक आणि तुमचा देव तो माझा देव. तुम्ही मराल तेथे मी मरेन."

**निवेदक:** रूथ अध्याय 2 मधून कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग थोडक्यात सांगून म्हणा, "रूथ नामीला काय सांगते ते ऐका."

**रूथ:** "आई, आपल्याला धान्य हवे. मी शेतात कापणी करणाऱ्यांच्या मागे जाऊन सरवा वेचून आणते" (कामकऱ्यांकडे जाऊन खाली पडलेली धान्याची ताटे उचलून घेण्याचा अभिनय करा)

**बवाज:** "मुकादम दादा माझ्या शेतात सरवा वेचणारी ही स्त्री कोण आहे?" मवबाहून आलेली

**कामकरी:** "ती रूथ गरीब बिचारी विधवा आहे. ती पुष्कळ काम करते आणि क्वचितच् आराम करते."

**बवाज:** रूथकडे जाऊन म्हणा, " रूथ, तू नामीशी कशी दयाळूपणे वागलीस हे मला समजले माझ्याच शेतांतून सतरवा गोळा कर आणि माझ्या कापणी करणाऱ्यां बरोबरच जेवायला बस."

**बवाज:** कामकऱ्यांकडे जाऊन म्हणा, "रूथला सरवा वेचू द्या. चालता चालता पेंढयातून मूठ मूठ टाकीत जा तिला धमकावू नका."

**निवेदक:** "त्या संध्याकाळी रूथने नामीला काय सांगितले ते ऐका."

**रूथ:** "आई आज मी बवाजच्या शेतात एवढे सारे धान्य वेचले!"

**नामी:** "बाळा बवाज आपला जवळचा आप्त आहे. आम्हा गरीब विधवांवर त्याने दया केली देव त्याचे भले करो! हा हंगाम संपेपर्यन्त तू इतर कोणाच्याही शेतात जाऊ नकोस."

**निवेदक:** रूथचा उर्वरित कथावृत्तांत्त थोडक्यात सांगा. वर अध्याय 3 व 4 ह्यांचे दिलेले स्पष्टीकरण पुन्हा सांगा मदत करणाऱ्यांचे आभार माना.

प्रश्न मुलांनी ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर अध्याय 2 साठी दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत.

**चित्र:** स्थानिक ठिकाणी पिकणाऱ्या धान्याच्या पेंढयांचे चित्र काढा, मुलांना ते उतरून घेण्यास सांगा. मुलांनी हे चित्र उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवून रूथ व बवाजने आशीर्वादांमध्ये कुटुंबातील सदस्यांना सहभागी करून घेऊन त्यांची कशी काळजी धेतली, ते ह्या वरून स्पष्ट होते असे सांगावे.

आमची काळजी घेण्यासाठी देव कुटुंबातील सदस्यांचा कसा उपयोग करून धेतो याच्या इतर उदाहरणांची चर्चा करा. मोठया माणासांनी आणि मुलांनी उदाहरणे सांगावित तसेच विचारा देवाने आम्हांला कोणत्या थोर कुटुंबाचे कायमचे सदस्य केले आहे?

कविता चार मुलांनी नीतिसूत्रे 31:10,15,20 व 30 ही वचने प्रत्येकी एक अशी म्हणावीत.

रूथ 1:16–17 मधून रूथचे शब्द वापरून मोठया मुलांनी कविता वा गीत लिहावे.

पाठ करा इफिस 6:1–3

**प्रार्थना** "प्रिय प्रभू, आमच्या कुटुंबांबद्दल आम्ही तुझे आभार मानतो आमच्या आई वडीलांचा मान राखण्यास आणि तू आमची सेवा केलीस तशी एकमेकांची सेवा करण्यास आमचे साहाय्य कर. आमच्या कुटुंबातील सदस्यांना तुझी तारणारा म्हणून ओळख होऊ देत, असे कृपा करून तू कर."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net